सकाळ
सिंधुदुर्ग, सोमवार,
३१ ऑगस्ट २०१५



# खेड्यापाड्यांचा विकास तरुणांच्या हाती

## दीपक केसरकर : दोडामार्गात आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा

सकाळ वृत्तसेवा

दोडामार्ग, ता. ३० : खेड्यापाड्यांचा विकास करण्याची क्षमता तरुणांमध्ये असते. त्यामुळे त्यांनी ग्रामीण भागाच्या गरजा लक्षात घेऊन त्या पूर्ण करण्याचा प्रयत्न करायला हवेत, असे मत वित्त व ग्रामविकास राज्यमंत्री दीपक केसरकर यांनी येथे व्यक्त केले.

येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात दोन दिवशीय जिल्हास्तरीय आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा झाली. त्याचे उद्‌घाटन केल्यावर ते बोलत होते.

ते म्हणाले, "सिंधुदुर्गाचा विकास पर्यटन व अन्य मार्गाने होण्यासाठी तरुणांनी प्रशिक्षित व्हायला हवे. जिल्ह्याच्या विकासासाठी ते पुढे यायला हवेत. देशाच्या विकासात तरुणांचे योगदान मोठे आहे. त्यामुळे विकास साधण्यासाठी तरुणांनी उद्योग, व्यवसायाबरोबर निसर्ग आणि पर्यावरण सांभाळायला हवे. जीवनात यशस्वी व्हायचे असेल, तर आपल्या कामाशी प्रामाणिक हवे. काम कोणतेही असो, ते करताना कमीपणा बाळगता नये. आपण समाजाचा एक घटक आहोत, हे लक्षात घेऊन सामाजिक बांधिलकी जपली पाहिजे."

ते म्हणाले, "विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार करण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजनेमुळे होते. श्रमसंस्कार शिबिरातून अनेक मूल्यांची रुजवणूक व संवर्धन होत असते. राष्ट्रीय सेवा योजना हा युवकांना चांगला, सुजाण नागरिक बनविण्याचा आणि युवकांना ग्रामीण विकासासाठी योगदान देण्यास प्रवृत्त करणारा प्रभावी मार्ग आहे."

आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेच्या माध्यमातून आपल्याबरोबरच इतरांमध्ये आपत्तींना धैर्याने सामोरे जाण्याचे मनोबल निर्माण व्हायला हवे. त्यासाठी विशेष प्रयत्न व्हायला हवेत, असेही श्री. केसरकर म्हणाले.

दोन दिवस चालणाऱ्या या शिबिरात स्वयंसेवकांना आपत्ती व्यवस्थापनाची संकल्पना व ते कसे करावे. याविषयी तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. त्यांच्याकडून प्रात्यक्षिक करून घेतली जाणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सदस्य सूर्यकांत परमेकर होते. त्यांच्या हस्ते केसरकर यांचा, तर प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी मुंबई विद्यापीठ एन. एस. एस. विभाग समन्वयक प्रा. बी. एस. बिडवे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. डॉ. पाटील यांनी प्रास्ताविक केले. संकल्पना, महत्त्व व उद्दिष्ट प्रा. बिडवे यांनी सांगितले. व्यासपीठावर प्रांताधिकारी व्ही. जी. इनामदार, तहसीलदार संतोष जाधव, स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य बाबूराव धुरी, सूचन कोरगावकर, उपसभापती आनंद रेडकर आदी होते. विद्यार्थी, जिल्ह्यातील महाविद्यालयातून आलेले एनएसएस स्वयंसेवक उपस्थित होते.



दोडामार्ग : आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेचे उद्‌घाटन करताना पालकमंत्री दीपक केसरकर. शेजारी व्ही. जी. इनामदार, बाबूराव धुरी, सूचन कोरगावकर आदी.

### शैक्षणिक साहित्यासाठी पाच लाख रुपये

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी उभारलेल्या या महाविद्यालयाला आपण सदैव सहकार्य करेन, असे सांगून श्री. केसरकर यांनी आमदार निधीतून पाच लाख रुपये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक साहित्यासाठी देण्याची घोषणा केली.